अपंग व्यक्ती, वरिष्ठ नागरिक व समाजातील दुर्लक्षित घटक यांच्यासाठी ११ ठिकाणी स्थापन केलेल्या विशेष न्यायालयाच्या निधीबाबत

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग,

शासन निर्णय क्रमांक : विशेन्या-१३१८/प्र.क्र.२१/नऊ,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

दिनांक : ११ एप्रिल, २०१८.

प्रस्तावना :

अपंग व्यक्ती, वरिष्ठ नागरिक व समाजातील दुर्लक्षित घटक यांच्याशी संबंधित १००० पेक्षा जास्त प्रकरणे प्रलंबित असलेल्या परभणी, मुंबई, ठाणे, अहमदनगर, सातारा, लातूर, पुणे, नागपूर, सांगली, नाशिक व औरंगाबाद या ११ ठिकाणी विशेष न्यायालये स्थापन करण्यास व त्यासाठी पदनिर्मिती करण्यास शासन निर्णय क्रमांक-जगन्या-१३१४/प्र.क्र.१६४/नऊ, दि.३मार्च,२०१८ अन्वये शासन मान्यता देण्यात आलेली आहे. या ११ विशेष न्यायालयासाठी सन २०१८-१९ करीता नवीन बाबीव्दारे निधी मंजूर करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :

राज्यातील अपंग व्यक्ती, वरिष्ठ नागरिक व समाजातील दुर्लक्षित घटक यांच्याशी संबंधित प्रकरणांच्या अनुषंगाने स्थापन केलेल्या परभणी, मुंबई, ठाणे, अहमदनगर, सातारा, लातूर, पुणे, नागपूर, सांगली, नाशिक व औरंगाबाद या ११ ठिकाणच्या विशेष न्यायालयाकरीता सन २०१८-१९ साठी आवश्यक असलेल्या निधीबाबत अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये"२०१४, न्यायदान-(भारित) १०२-उच्च न्यायालये, १०२ (०९) (०१) न्यायालयाची दर्जावाढ व प्रलंबित प्रकरणे त्वरित निकालात काढण्यासाठी विशेष अनुदाने (अनिवार्य) (२०१४०३८८) या लेखाशिर्षाखाली नवीन बाब प्रस्ताव सादर करण्यात आला होता. तो मंजूर झालेला आहे. त्यामध्ये पुढीलप्रमाणे उद्दिष्टनिहाय निधीची तरतूद मंजूर झालेली आहे.

रुपये (हजारात)

०१ वेतन	३,६६,०९
०३ अतिकालीक भत्ता	२८
०६ दूरध्वनी, वीज व पाणी शुल्क	१६,५०
११ देशांतर्गत प्रवास	१६,५०
१३ कार्यालयीन खर्च	२२,००

१४ भाडेपटटी व कर	१,६५
१७ संगणक खर्च	४,९५
२७ लहान बांधकामे	८०
२८ व्यावसायिक सेवा	४९,५०
५२ यंत्रसामग्री व साधनसामग्री	४४
एकूण	४,७८,७१

२. उपरोक्त तरतूद वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.२ एप्रिल,२०१८ नुसार वितरीत करणे आवश्यक आहे. त्यासाठी याप्रकरणी नवीन बाबीव्दारे अर्थसंकल्पीत केलेला वरील निधी खर्च करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharshtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०४१२११२९१३१९१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशांनुसार व नावाने,

Amogh Shyamkant Kaloti

Digitally signed by Amogh Shyamkant Kaloti
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law and Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1f733daf00a6028414c43d0cc10d82acab3b732c4ed d56e818f8a3b355588753, serialNumber=9ebeebf21dc54ceec51e6d5ffc84bb94ca6af89 497279007d66e97dc13547037, cn=Amogh Shyamkant Kaloti
Date: 2018.04.12 11:29:52 +05'30'

(अ.श्या.कलोती)
विधि सल्लागार-नि-सह सचिव

प्रति,

१. मा. महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई.
२. सर्व प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश
३. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा / मूळ शाखा), मुंबई.
४. प्रबंधक, उच्च न्यायालय, नागपूर, औरंगाबाद व पणजी खंडपीठ.
५. महालेखापाल- एक (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), मुंबई.
६. महालेखापाल- दोन (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), नागपूर.
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
८. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
९. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१०. वित्त विभाग /व्यय-५, अर्थ-११.
११. विधि व न्याय विभागातील सर्व कार्यासने.
१२. निवड नस्ती-कार्या/९.